# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### उस्मानाबाद नगरपरिषदेस वैशिष्टयपुर्ण योजनेअंतर्गत वितरित करण्यात आलेल्या निधीबाबत

**(१) ४२४६१ (३१-०३-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर परिषद उस्मानाबादला नगर विकास विभागा मार्फत वैशिष्टयपुर्ण योजनेअंतर्गत शासन निर्णय क्रं.न.पा.वै-२०२२-२१ / प्रक्रं-१७६ (१५) नवि-१६, दिनांक ३ नोव्हेंबर २०२१ अन्वये रुपये ७ कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार उस्मानाबाद शहरातील नगर परिषद शाळा क्र.११ येथील उद्यान विकसित करणे, नगर परिषद उस्मानाबाद शहरातील नगर परिषद शाळा क्र.१८ येथील उद्यान विकसीत करणे तसेच उस्मानाबाद शहरातील जिजामाता उद्यान विकसित करणे या कामास निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाची निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, वितरित करण्यात आलेल्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे करण्यासाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०९-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

नगर विकास विभागा मार्फत वैशिष्टयपुर्ण योजनेअंतर्गत शासन निर्णय दिनांक ३ नोव्हेंबर २०२१ अन्वये रुपये ७ कोटीचा निधी नगर परिषद उस्मानाबादला मंजूर करण्यात आला आहे.

(२) होय खरे आहे.

सदर निर्णयानुसार उस्मानाबाद शहरातील नगर परिषद शाळा क्र.११ येथील उद्यान विकसीत करणे यासाठी रु.२००.०० लक्ष, नगर परिषद उस्मानाबाद शहरातील नगर परिषद शाळा क्र.१८ येथील उद्यान विकसीत करण्यासाठी रु. २००.०० लक्ष यासाठी आणि उस्मानाबाद शहरातील जिजामाता उद्यान विकसीत करण्यासाठी रु.३००.०० लक्ष असा एकूण रु.७००.०० लक्ष निधी मंजूर करण्यात आला होता.

(३) होय हे खरे आहे

सदर कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या, तथापि कार्यारंभ आदेश देण्यात आले नाहीत.

(४) शासन निर्णय दि. ३ नोव्हेंबर २०२१ नुसार मंजूर कामांना दि.२५.०७.२०२२ शासन निर्णयान्वये तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती. सदरची स्थगिती कामात बदल करून शासन शुध्दीपत्रक क्रमांक-नपावै-२०२१/प्र.क्र.१७६(१५)/ नवि-१६ दि. २५.०७.२०२३ अन्वये उठविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### परभणी जिल्ह्यातील जिंतूर-परभणी राज्य महामार्गाचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(२) ४५५५८ (२१-०९-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील जिंतूर-परभणी राज्य महामार्गाचे काम मागील पाच वर्षापासून अपुर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गाचे काम एस.के.कामथे ॲण्ड कंपनीला देण्यात आले असून २१२ कोटींच्या कामांना २४ महिन्यांऐवजी ५४ महिन्यांचा कालावधी उलटून देखील रस्त्याचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी करुन महामार्गाचे काम संथगतीने करणाऱ्या कंत्राटदार कंपनीवर काय कारवाई केली आहे व सदर महामार्गाचे काम तातडीने पूर्ण होण्याच्या अनुषंगाने काय उपाययोजना केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२५-०९-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर काम राष्ट्रीय महामार्ग ७५२-K चा भाग असुन सद्य:स्थितीत ३७.९४८ कि.मी पैकी ३७.०९१ कि.मी. (९८%) कॉक्रीटीकरणाच्या (PQC) रस्त्याचे काम पुर्ण झालेले आहे. लहान-मोठया ४७ पुलांची कामे पुर्ण झालेले असुन ०४ पुलांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) अंशत: खरे आहे.

सदर महामार्गाचे काम हे मे. एस.के.कामथे ॲण्ड कंपनीला देण्यात आलेले नसून या कामाचे मे. पी.एस.के व मे. ऋत्वीक प्रोजेक्ट लि., हैद्राबाद (जे.व्ही) यांना दि. २०.०९.२०१७ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. सदर कामाचा पुर्णत्वाचा दिनांक २०.०९.२०१९ असा होता. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या विद्युत वाहिन्या, पाणी पुरवठा वाहिन्या इ. चे स्थलांतर, स्थानिक नागरीकांचा विरोध, मुरुम परवानगीसाठी मा. राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण यांनी घातलेल्या पायबंदीमुळे सदर कामाच्या मुदतवाढीचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग विभाग, मुंबई (MORTH) यांच्याकडे मंजूरीकरीता सादर केलेला आहे.
(३) कंत्राटदारास संथगतीने काम करण्याबाबत निविदा शर्तीनुसार नोटीस देण्यात आलेली आहे. काम वेळेत पुर्ण व्हावे म्हणून आवश्यक तो पाठपुरावा सुरु असुन महामार्गाचे बांधकाम माहे ऑक्टोबर -२०२३ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) १. COVID-१९ मुळे कामे प्रलंबित.
२. भुसंपादनाच्या कार्यवाहीत विलंब.
३. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या विद्युत वाहिन्या, पाणी पुरवठा वाहिन्या इ. चे स्थलांतर.
४. स्थानिक नागरीकांचा विरोध.
५. मुरुम परवानगीसाठी राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण यांनी घातलेली पायबंदी.

---

**पुणे महानगरपालिका हद्दीतील राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध कार्यालयांची पाणीपट्टीची थकबाकी असल्याबाबत**

**(३) ४६८५३ (१०-११-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिका हद्दीतील राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध कार्यालयांची १०५ कोटी रुपयांची पाणीपट्टीची थकबाकी असल्याची बाब दिनांक १७ मे, २०२२ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२३) :** (१) होय, पुणे महानगरपालिका हद्दीतील राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध कार्यालयांची पाणीपट्टीची थकबाकी १९४.६९ कोटी आहे.
(२) व (३) उक्त प्रकरणी पुणे महापालिकेतर्फे संबंधित कार्यालयास थकबाकी भरणेबाबत वेळोवेळी नोटीसा बजावण्यात येऊन पुढील कर्यवाही करण्यात येत असल्याचे तसेच मा. उच्च न्यायालयाकडून आयोजित लोक न्यायालयात देखील संबंधितांस उपस्थित राहणेबाबत नोटीस देण्यात आले असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## अंजनगाव सुर्जी (जि. अमरावती) तालुक्यात झालेल्या गारपीठ व अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानाची भरपाई मिळण्याबाबत

**(४) ४७१८५ (१४-१०-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्जी (जि. अमरावती) तालुक्यात माहे फेब्रुवारी, मार्च ,एप्रिल २०२० या कालावधीत झालेल्या गारपीठ व अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात शेतपिकांचे नुकसान झाले असून २६३ हेक्टरवरील पीक नष्ट झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात एकूण २६९ शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून शेतपिकांच्या नुकसानाच्या सर्वेक्षणाअंती रु. ४७,२१,४४५ रुपये एवढी नुकसानभरपाई शासनाकडून मंजूर झाली असून ८,४१,५०० रुपये एवढा निधी प्राप्त झाला होता. परंतु उर्वरीत ३८,७९,९४५ रुपये निधी अप्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्वरीत निधी उपलब्ध करून देण्याबाबत मदत व पुनर्वसन मंत्री यांना लेखी पत्राद्वारे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने उर्वरित निधी वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१५-०९-२०२३) :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) शासन निर्णय, क्र.सीएलएस-२०२०/प्र.क्र.२५५/म-३, दि. १८ फेब्रुवारी, २०२१ अन्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांना या प्रयोजनासाठी एकूण रु.२६८४.६१ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामधून जिल्हाधिकारी, अमरावती यांनी या प्रयोजनाकरीता दिनांक १२.०८.२०२२ रोजी एकूण शेतकरी २०६ यांना रुपये ३७,८२,६१०/- एवढा निधी वितरीत केला आहे. सदर अनुदान वाटपाची कार्यवाही पुर्ण झालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील महानगरपालिकेच्या वैकुंठ स्मशानभूमीची झालेली दुरवस्था

**(५) ४८०५२ (२८-०९-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील महानगरपालिकेच्या स्मशानभूमीतील नाल्यावरील सीमा भिंत कोसळली असणे, शौचालयाचे नूतनीकरण, दहन शेडचे नूतनीकरण, पार्किंग रस्ता, आसन व्यवस्थेची दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मशानभूमीतील दुरवस्था होण्याची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने दिनांक ३१ मे, २०२२ अखेर याची सध्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पाहणी करुन झालेली दुरवस्था सुधारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२३) :** (१), (२) व (३) वैकुंठ स्मशान भूमीची रस्ता लगतची पूर्वेकडील सिमाभिंत ३ ते ४ वर्षापूर्वी धोकादायक झालेली होती. नाल्यावरील सिमाभिंत कोसळल्याचे निर्दशनास आलेले नाही. सद्यस्थितीत सदरील सिमाभिंत नव्याने बांधण्यात आलेली आहे. तसेच दहन शेड क्र. १ व २ चे पत्र्याचे नुतनीकरण करण्यात आलेले आहे. दशक्रिया आसन व्यवस्थेचे नुतनीकरण केलेले आहे. शौचालयाच्या नुतनीकरनकरिता निविदा काढण्यात येत आहे. पार्किंग रस्ता व्यवस्थित आहे.

सन २०२३-२४ मध्ये प्राप्त रु. ७५ लक्ष तरतुदीमधून दहन शेड दुरूस्ती, गेट बसविणे, रस्ता काँक्रीटीकरण इ. सुधारणा कामे करणेत येत आहेत
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील जिंतूर व सेलू येथील कोल्हापुरी बंधाऱ्याच्या कामात केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(६) ५१०१९ (१८-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना येथील तत्कालीन मृद व जलसंधारण अधिकारी श्री.कविराज कुच्चे यांच्या अखत्यारित येणा-या जिंतूर व सेलू तालुक्यात कोल्हापूरी बंधा-यांच्या तीन कोटींच्या कामात अनियमितता झाल्याचे निदृर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत राज्यशासनाकडे तक्रार झाल्यानंतर औरंगाबादच्या गुण नियंत्रण अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या तक्रारीची चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश शासनाने दिल्याने नांदेड येथील अधिकऱ्यामार्फत चौकशीनुसार श्री.कुच्चे यांचा पदभार काढून जिल्हा परिषदेत पाठविले असतानाही श्री.कुच्चे यांना परभणी येथे नव्याने मृद व जलसंधारण अधिकारी म्हणून पदभार दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, श्री.कुच्चे यांचा परभणी जिल्ह्यातील पदभार काढुन घेण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीअंती संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२२-०८-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

तत्कालीन जालना विभागांतर्गत परभणी उपविभागातील ० ते १०० हेक्टर क्षमतेच्या कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांच्या सर्वेक्षणाच्या कामात तीन कोटीची अनियमितता झाल्याबाबत तक्रारीच्या अनुषंगाने प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, औरंगाबाद यांनी दि.०९/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालावरून अनियमितता झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे.
(२) हे, खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.

मृद व जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.२६/०५/२०२२ अन्वये जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, परभणी या नवीन विभागीय कार्यालयाची निर्मिती करण्यात आली आहे. सदर नवनिर्मित विभागीय कार्यालय तात्काळ चालू करण्याच्या अनुषंगाने शासनाच्या दि.१६/०६/२०२२ रोजीच्या शासन आदेशान्वये श्री.कविराज जवाहरलाल कुच्चे, जिल्हा जलसंधारण अधिकारी , जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, जालना यांच्याकडे सदरहू पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. तद्नंतर श्री. कविराज जवाहरलाल कुच्चे, जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद, (ल.पा.) विभाग, जालना यांची शासनाच्या दि.०३/०२/२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, परभणी या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) जिंतूर व सेलु तालुक्यातील कोल्हापूरी बंधाऱ्याच्या कामाबाबत /सर्वेक्षणाच्या तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त, मृद व जलसंधाण विभाग, औरंगाबाद यांनी शासनास सादर केलेला अहवाल तसेच प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, औरंगाबाद यांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नांदेड यांचा अभिप्रायासह सादर केलेला चौकशी अहवाल या दोन्ही अहवालाच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यासाठी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, ठाणे (प्रभारी मुख्य अभियंता तथा पदसिध्द सह सचिव, मृद व

जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५/०३/२०२३ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर चौकशी समितीचा अहवाल दि.१८/०७/२०२३ रोजी प्राप्त झाला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही सूरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अमरावती शहरात अमृत योजनेअंतर्गत भुयारी गटारी योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत

**(७) ५१२३९ (२०-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात अमृत योजनेअंतर्गत भुयारी गटारी योजना टप्पा क्रमांक १ राबविण्यात येत असून अद्यापही सदरचे काम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना किती वर्षापासून सुरू असून, अमरावती शहरातील या योजनेची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर योजना पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०९-२०२३) :** (१), (२), (३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अमरावती शहराच्या रुपये ८१.८७ कोटी किंमतीच्या मलनिस्सारण प्रकल्पास दिनांक २६ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली असून दिनांक १३ नोव्हेंबर, २०१८ रोजी सदर प्रकल्पाचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

सद्य:स्थितीस सदर प्रकल्पातील शिल्लक कामांमध्ये तांत्रिक बदल उद्भवल्यामुळे तांत्रिक बदलाच्या प्रस्तावावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत कार्यवाही सुरु असून सदर तांत्रिक बदलाबाबतचा निर्णय झाल्यानंतर उर्वरित कामे पूर्ण करण्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांचे नियोजन आहे.

---

### पुणे शहरातील खराडी भागात पर्यावरणाची पायमल्ली होत असल्याबाबत

**(८) ५१५३१ (२७-०१-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खराडी (जि.पुणे) येथील इऑन फेज २ समोरील रस्ता दुभाजकावर पाच वर्षापासून वाढलेली १८ झाडे तोडण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, होर्डींगचा व्यवसाय करणाऱ्या लोकांनी हे झाडे तोडली असून सदर प्रकरणी संबंधीत व्यावसायिकावर प्रशासनाने गुन्हा दाखल केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित प्रकरणातील व्यावसायिक तसेच अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) पुणे महानगरपालिकेमार्फत सदर घटनेबाबत चंदन नगर पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. तसेच सदर वृक्ष तोडीबाबत मा. जुडीशिअल मॅजिस्ट्रेट कोर्ट नं.१, शिवाजीनगर, पुणे येथे फैजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.

(३) जाहिरात फलका विरोधात कार्यवाही मध्ये दिरंगाई केली असल्याने श्री.विजय थनवाल व श्री.विनायक पवार आकाश परवाना निरीक्षण यांना निलंबित करण्यात आले असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांतील विकास कामांबाबत**

**(९) ५१७४८ (२२-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेचा कारभार गत सहा महिन्यांपासून प्रशासकांकडे सोपविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासकाच्या कारभारामुळे येथे रस्ते, पथदिवे, पदपथ, पाणी पुरवठयासह छोटया-मोठया विकास कामांकडे लक्ष देण्यात येत नसल्याच्या तक्रारी पुणे महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या २३ गावांतील नागरिक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने येथे प्रस्तावित विकास कामांची निविदा प्रक्रिया राबविणे आणि त्यानुसार कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२३) :** (१) होय,
(२) अंशतः खरं आहे.
पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये पूर्वीप्रमाणे ग्रामपंचायतमार्फत रस्ते पथदिवे, पदपथ व पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आलेली होती. त्याप्रमाणे सद्यस्थितीमध्ये दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत. सध्य स्थितीमध्ये अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांच्या तक्रारी येत आहेत ही वस्तुस्थिती आहे.
(३) पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांसाठी सन २०२२-२३ साठी खालीलप्रमाणे तरतुद उपलब्ध करण्यात आली होती.

| अनु.क्र. | विभाग | भांडवली कामे व देखभाल दुरुस्ती कामे |
|---|---|---|
| १ | पथ | रु. ११५.५० कोटी |
| २ | पाणीपुरवठा | रू.३०.१४ कोटी |
| ३ | विदयुत | रु.२.३० कोटी |
| ४ | घनकचरा | १) प्रकल्प उभारणीसाठी रु.२६ कोटी खर्च करण्यात आलेला आहे. २)प्रकल्प देखभाल दुरुस्ती खर्च-६.६५ कोटी,<br>३) कंत्राटी सेवक रु. १५.५ कोटी असे एकूण रु.२५ कोटी चे वार्षिक खर्च करण्यात येत आहे.<br>नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांमधीलकचरा वाहतुकीसाठी रु.१३.७७ कोटी चे वार्षिक खर्च करण्यात येत आहे. |

त्यानुसार निविदा प्रक्रिया राबवून कामे प्रगतीपथावर आहेत. याचप्रमाणे पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी मे. ए. एल. एन. मालविया इन्फ्रा प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड यांना या २३ गावांचे डीपीआर तयार करण्यासाठी कार्यादेश दिले असून त्यांनी दोन गावांचे डीपीआर तयार केले असून त्यानुसार सूस, म्हाळुंगे व बावधान बुद्रुक या गावांसाठी डीपीआर तयार असून त्यानुसार निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आले आहे. समाविष्ट गावांमध्ये अस्तित्वात असलेल्या पथदिव्यांचे दुरुस्ती व देखभालीचे कामे निविदा प्रक्रिया राबवून करण्यात येत आहेत.

नव्याने समाविष्ट झालेल्या गावांसाठी मलनिःसारण, कामासाठी DPR तयार करण्यासाठी तज्ञ सल्लागार मे प्रायमुव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सल्टंट प्रा. ली. यांचे नेमणूक करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील कल्याण डोंबिवली महानगरपालिका अंतर्गत विकास योजनेच्या एकत्रित विकास नियंत्रण नियमावलीनुसार सर्व प्रक्रिया पूर्ण केलेले नकाशे मंजूर करण्याबाबत**

**(१०) ५१७८५ (२२-०१-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिका अंतर्गत विकास योजनेच्या आरक्षण क्रमांक २७ नुसार लालचौकी कल्याण येथील "आर्ट गॅलरी म्युझियम आणि व्यापारी संकुल" प्रकल्प शासनाच्या व मनपाच्या सर्व नियम व अटी पाळून १० वर्षापासून बांधून तयार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परंतु सदर प्रकल्प अद्यापही पूर्णत्वास न गेल्यामुळे मनपाचे तसेच विकास कामांचे अतोनात नुकसान झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पास लागणारे सर्व प्रकारचे सहाय्य करण्यास विकासक बांधील आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बाब मान्य करून कल्याण-डोंबिवली महानगरपालिका विशेष प्रकल्प/८४ दिनांक ६२६/८/२०२१ विभागाच्या प्रस्तावानुसार तसे आदेश निर्गमित करून महानगरपालिकेस तात्काळ कारवाई करून प्रकल्प पूर्ण करण्याचे आदेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) निविदा अटी शर्तीची पूर्तता झाली किंवा कसे, याबाबत तपासणी केली असता, विकासकाने निविदा अटीनुसार प्रकल्प अधिमूल्याचा पहिला व दुसरा हप्ता अनुक्रमे दि.२८.०८.२००८ व दि.३०.०९.२००८ रोजी जमा केला होता. मात्र ३ रा व ४ था हप्ता दि.१५.११.२०१४ रोजी भरला. सदर विलंबाबाबत, करारनाम्यातील अटीनुसार विलंब शुल्क भरले नव्हते.
सदर विलंब शुल्काची व्याजासह होत असलेली रू. ६,३०,३३,५९४/- इतकी रक्कम महानगरपालिकेत भरणा केल्यानंतर बांधकाम परवानगी देण्यात येईल, असे विकासकास दि.३०.११.२०२२ रोजी कळविण्यात आले.
(४) विकासक यांनी दि.०६.०१.२०२३ रोजी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने दि.१०.०२.२०२३ रोजीच्या सुनावणीत, "याप्रकरणी प्रथम महानगरपालिका स्तरावर सुनावणी घेऊन निर्णय घेणे अपेक्षित आहे," असे निर्देश दिले.
त्यानुसार दि.०९.०३.२०२३ रोजी विकासक व बी.ओ.टी. प्रकल्प समिती यांची सुनावणी आयोजित करण्यात आली होती.
सदर सुनावणीमध्ये विकासक यांनी UDCPR नुसार अनुज्ञेय व स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी नुसार शक्य होणाऱ्या अधिकतम बांधकाम क्षेत्रफळानुसार प्रस्ताव सादर करण्याचा, तसेच, सहायक संचालक, नगररचना यांनी आरक्षण क्र. २७ 'आर्ट गॅलरी, म्युझियम व व्यापारी संकुल ' बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम कलम ३७ अन्वये "व्यापारी संकुल व हॉस्पीटल" असा फेरबदल करण्यासाठीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी यांच्याकडून होत असलेल्या अनियमिततेबाबत**

**(११) ५२४४४ (१९-०१-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, श्री माने व मोटार वाहन निरिक्षक, श्री.विघ्ने हे नागरिकांना व वाहनधारकांना प्रत्येक कामासाठी सक्ती करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही अधिकारी वाहनधारक, सर्व प्रकारचे एजन्सी मालक, चालक-मालक संघटना यांच्याकडून हप्ते वसूली करुन संगनमताने मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करीत असल्याचेही निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील अनियमितता व आर्थिक गैरव्यवहाराची त्रयस्त अधिकाऱ्यांच्या समितीमार्फत व लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत त्यांचे आर्थिक व्यवहार मत्ता दायित्वासहित स्तरनिहाय, संचिकानिहाय लेखापरिक्षण अहवालासह सविस्तर चौकशी करण्यात यावी, अशी स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये परिवहन आयुक्त, मुंबई, मा. उपमुख्यमंत्री तसेच मा. मुख्यमंत्री यांना निवेदन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने त्यासंदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२३) :** (१) व (२) नाही.

(३) व (४) प्राप्त अहवालानुसार मा. श्री. संदीप क्षिरसागर, वि.स.स. यांनी त्यांच्या दि. ०७ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये "बीड उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी यांच्याकडून सातत्याने होत असलेल्या अनियमितेबाबत" या विषयाची तक्रार परिवहन आयुक्त कार्यालयाकडे केली आहे.

सदर प्रकरणी प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. तसेच, याप्रकरणी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना या प्रकरणी जलदगतीने तपास करुन अहवाल शासनास सादर करणेबाबत दि.०५ जुलै,२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनस्तरावरुन कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरुड, मोर्शी आणि शेंदुर्जनाघाट (जि.अमरावती) नगरपालिकेच्या मंजूर कामांवरील स्थगिती उठविण्याबाबत**

**(१२) ५२६५५ (२२-०१-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत मोर्शी आणि वरुड नगर परिषदेची तसेच अधिसूचित विशिष्ट नागरी सुविधा पुरविणे अंतर्गत वरुड मोर्शी आणि शेंदुर्जनाघाट नगरपालिकेच्या माहे एप्रिल, २०२२ मध्ये मंजुरी प्रदान करण्यात आलेल्या कामांना स्थगिती देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामांना असलेली स्थगिती उठविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनावर मा.उपमुख्यमंत्री महोदय यांनी तपासून कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त मंजूर कामांना असलेली स्थगिती उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०९-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय खरे आहे.
(३) वरुड व मोर्शी नगरपरिषदेकरिता दि. १९.०४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या अनुक्रमे रु. १.९० कोटी व रु.३.१० कोटीच्या कामांस दि. ०६ जुलै, २०२२ रोजीच्या आदेशान्वये दिलेली तात्पुरती स्थगिती दि.२१ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये उठविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## नांदुरा नगरपरिषद (जि.बुलढाणा) येथील प्रारूप विकास योजना नवीन नियोजन प्रमाणकानुसार सुधारित करण्याबाबत

**(१३) ५४३१७ (२७-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरा नगरपरिषद (जि.बुलढाणा) येथील प्रारूप विकास योजना नवीन नियोजन प्रमाणकानुसार सुधारित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०२२ रोजी शासनास लेखी निवेदन सादर केलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संचालक नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग यांनी विकास योजना तयार करतेवेळी आरक्षणाची संख्या कमी होत असल्याबाबतच्या तक्रारी नागरिकांनी स्थानिक प्रशासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार नियोजन प्रमाणकानुसार सुधारित प्रारूप योजना करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२३) :** (१) व (२) मा. लोकप्रतिनिधी यांचे दि.०३.१०.२०२२ रोजीचे लेखी निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(३) व (४) नांदुरा नगरपरिषदेची प्रारुप विकास योजना (सुधारित + वाढीव हद्द) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये नांदुरा नगर परिषदेकडून अद्याप मंजुरीस्तव शासनास सादर झालेली नाही. त्यामुळे सद्य:स्थितीत प्रस्तुतच्या प्रारुप विकास योजनेसंदर्भात नगरपरिषद नांदुरा स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

## पुणे शहरातील मिळकतीच्या जीआयएस मॅपिंगद्वारे सर्वेक्षणाचे काम दिलेल्या दोन कंपन्यांनी चुकीचे सर्वेक्षण केल्याबाबत

**(१४) ५४४०३ (२७-०१-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील मिळकतीच्या जीआयएस मॅपिंगद्वारे सर्वेक्षणाचे काम दिलेल्या दोन कंपन्यांनी चुकीचे सर्वेक्षण केल्याने ४० टक्के सवलत गमवण्याचा भुर्दंड नागरिकांना बसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दोन्ही कंपन्यांचे देयके अदा करण्यापूर्वी त्यांच्याकडून शहरातील ९७ हजार मिळकतीचे पुन्हा एकदा सर्वेक्षण करून घ्यावे, त्याशिवाय त्यांचे ६ कोटी रुपयांचे देयक अदा करू नये, असा अभिप्राय मिळकतकर विभागाने दीड महिन्यापूर्वी अतिरिक्त आयुक्तांना पाठवला हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२३) :** (१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) मे. सार आय. टी. रिसोर्सेस प्रा.लि.व मे.सायबर टेक सिस्टीम सॉफटवेअर लि. या निविदा धारकांना उर्वरित देय रक्कमा, बँक गॅरंटी व सुरक्षा अनामत अनुक्रमे एकूण रक्कम रु. १०,३२,९६,०४५ व रु.१,६४,४९,४९६ व रू. ३,७३,७९,५६७,२५ इतकी जप्त (forfeit) करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत प्रवासांना सोयी सुविधा देण्यात आली नसल्याबाबत

**(१५) ५४८०० (२७-०१-२०२३). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत अत्याधुनिक बस थांबे बांधण्यात आले असून या बस थांब्यावर चार वर्षानंतरही विविध मार्गावर तासनतास बसच येत नाही तर या बस थांब्यावर प्रवासीही थांबू शकतील असा कोणत्याच सोयी सुविधा उपलब्ध नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असे असतांनाही या बस स्टॉपवरील जाहिरातीच्या माध्यमातून कोटयावधी रुपये गोळा करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०९-२०२३) :** (१), (२) व (३) औरंगाबाद शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत बांधा, वापरा आणि देखभाल या तत्वावर १५० बस थांबे (बस निवारा) प्रकल्पाचे कार्यादेश दिनांक १५.०७.२०१९ रोजी पुढील १५ वर्षांसाठी देण्यात आलेले आहेत आणि करारानुसार सदरील बस थांबे येथे संबंधित कंत्राटदाराकडून कराराच्या तरतुदीनुसार जाहिराती लावण्यात येत आहेत.
आज रोजी शहरातील विविध मार्गांवर आणि बस थांबे येथून ८० शहर बसच्या मार्फत वाहतूक सुरु असून शहर बस वाहतुकीच्या प्रवाश्यांना थांबण्यासाठी बस थांबे येथे थांबण्याची सोय केलेली आहे. तसेच, प्रवाश्यांच्या सुविधेसाठी बस थांबे स्वच्छ ठेवणे, रात्रीच्या वेळेस प्रकाशाची पुरेशी व्यवस्था करण्यात आलेली आहे.
सदर प्रकल्पांतर्गत कंत्राटदाराकडून औरंगाबाद स्मार्ट सिटीच्या स्मार्ट शहर बस विभागास सन २०२१-२२ मध्ये रुपये १८,२७,३४१/- व सन २०२२-२३ मध्ये फेब्रुवारी,२०२३ पर्यंत रुपये ४७,३२,६०४/- इतके उत्पन्न प्राप्त झाले असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, औरंगाबाद स्मार्ट सिटी यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गासाठी कंत्राटी पद्धतीवर नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचारी नियुक्ती रद्द केल्याबाबत

**(१६) ५६६५२ (२६-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गाच्या कामासाठी कंत्राटी पद्धतीवर नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचारी यांची १८० पदे दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास रद्द करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटी पद्धतीवर नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रद्द केल्याबाबतचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गाच्या कामासाठी किती कालावधी व निधी खर्चित केला आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुंषगाने मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गाच्या कामासाठी कंत्राटी पद्धतीवर नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (१३-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरामध्ये निवारा केंद्र उभारण्याबाबत

**(१७) ५६८७४ (२४-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई सारख्या शहरामध्ये १२५ निवारा केंद्रांची गरज असताना, सद्य:स्थितीत ही संख्या वीसचा आकडाही गाठू शकली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवारा केंद्रांची उपलब्धता वाढविण्याकरिता महानगरपालिकेने सर्वेक्षण केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने मुंबई शहरातील बेघरांकरिता पुरेशी निवारा केंद्र उभारण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) मोकळया जागांच्या अभावी बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात अद्यापपावेतो २७ निवारा केंद्रे सुरु आहेत.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने मे. आय. जी. एस. एस. एस. या संस्थेमार्फत सर्वेक्षण करुन मुंबईतील बेघरांची नोंद घेतली असून, ४६००० इतके बेघर मुंबईत आहेत.
(३) मुंबईतील बेघरांकरिता पुरेशी निवारा केंद्रे उभारण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-
महानगरपालिकेच्या विकास आराखड्यांतर्गत आरक्षित भूखंडांचे स्थळपरिक्षण करुन मोकळया भूखंडांवर निवारे बांधण्याकरिताच्या प्रक्रियेसाठीच्या पूर्व परवानग्या घेण्याचे काम सुरु आहे.
एस.आर.ए., म्हाडा या विकास प्राधिकरणांकडे तयार असलेल्या अतिरिक्त सदनिका निवारा केंद्रांसाठी हस्तांतरीत करणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला असून, त्यांच्याकडील उपलब्धतेनुसार एस.आर.ए., म्हाडा यांच्याकडून अतिरिक्त सदनिका / इमारती हस्तांतरीत / भाडेपट्टीवर घेण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## येवला (जि.नाशिक) नगरपालिका अंतर्गत नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी निधी वितरीत करण्याबाबत

**(१८) ५७१३६ (०९-०५-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) नगरपालिकेला अंतर्गत नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान ठोक तरतूद या योजनेतून नगरपालिका क्षेत्रातील मुलभूत व प्राथमिक सोयी-सुविधा पुरविण्यासाठी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी रुपये ५.०० कोटी निधी मंजूर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनुदानातून जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक ९ मार्च, २०२१ अन्वये रुपये ५.०० कोटीच्या विकासकामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांनी दिनांक १५ मार्च, २०२२ च्या पत्रान्वये शासनाकडे निधी वितरीत करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त कामांकरिता निधी उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदय व नगरविकास विभागाला दिनांक १५ ऑगस्ट, २०२२, दिनांक १८ सप्टेंबर, २०२२ व दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त संपूर्ण प्रकरणी वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान ठोक तरतूद या योजनेतून येवला नगरपरिषदेला निधी वितरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०९-२०२३) :** (१) तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री महोदयांच्या कार्यालयाकडून दि. २४ फेब्रुवारी, २०२० रोजी रु. ५.०० कोटी निधी येवला नगरपरिषदेस मंजूर केला होता. तथापि, प्रत्यक्षात येवला नगरपरिषदेस निधी वितरणाचे आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत.
(२) होय हे खरे आहे.
(३) होय हे खरे आहे.
(४) होय हे खरे आहे.
(५) सदर प्रकरणी सन २०२३-२४ मधील तरतुदीतून निधी वितरणाची कार्यवाही विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**पारनेर (जि.अहमदनगर) तालुका येथील पारनेर नगरपंचायतची नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत**

**(१९) ५७४८४ (२४-०४-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारनेर (जि.अहमदनगर) तालुका येथील पारनेर नगरपंचायतची नवीन प्रशासकीय इमारत बांधणी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील प्रशासनाच्या कामाचा व्याप वाढल्याने व सुसज्ज अशी प्रशासकीय इमारत नसल्याने स्थानिक नागरिकांची कामे वेळेत होण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) नगरपंचायत कार्यालय बांधण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मालकीची जागा पारनेर नगरपंचायतीकडे हस्तांतरण करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे दि. २० ऑक्टोबर, २०१६ रोजी प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुषंगाने जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

## पुणे राजीव गांधी प्राणी संग्रहालयातील तलावात वाढलेल्या जलपर्णी व ड्रेनेजच्या दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे स्थानिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(२०) ५७५८८ (२४-०४-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे राजीव गांधी प्राणी संग्रहालयातील तलावात वाढलेल्या जलपर्णीमुळे आणि तलावात सोडण्यात येत असलेल्या ड्रेनेजच्या दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे स्थानिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महानगरपालिका प्रशासनाच्या ड्रेनेज विभाग, आरोग्य विभागाशी सातत्याने पाठपुरावा करून देखील यावर उपाययोजना होत नसून संबंधित अधिकारी याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच तलावात मिळणारे मलवाहिन्यांचे पाणी तातडीने बंद होण्याच्या दृष्टीकोनातून मलवाहिन्या बदलण्याबाबत तसेच उपाययोजना करण्याबाबत शासनाने आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना सूचना देण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाच्या ड्रेनेज विभाग अधीक्षक व आरोग्य विभागाचे संबंधित अधिकारी हे राजशिष्टाचार पाळत नसून नागरी सेवा नियमांच्या तरतुदीचा भंग करत असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याने शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे राजीव गांधी प्राणी संग्रहालयातील तलावात संतोषनगर कडून येणाऱ्या नाल्यात मलवाहिनीच्या विकसनाचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे.

तसेच कात्रज तलावाचे पुर्व बाजूकडील जुनी व जीर्ण झालेली मलवाहिनी पूर्णत: गाळने भरलेली आहे व सदर मलवाहिनी बदलण्याचे काम सद्यस्थितीत जागेवर सुरू आहे.

तसेच जलपर्णी काढणेचे काम सुरू आहे.

(२) खरे नाही.

(३) खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदनगर (जि.नाशिक) येथील प्रदुषण नियंत्रण महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२१) ५८७६१ (२६-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर (जि.नाशिक) येथील गोल्ड काऊन्सिलींग क्लस्टर या संस्थेच्या हॉलमार्कींग सेंटरचा कारखाना सुरु करण्यासाठी नाशिक येथील प्रदुषण नियंत्रण महामंडळाच्या वर्ग-१ व वर्ग-२ च्या अधिकारी यांनी प्रदुषण नियंत्रण महामंडळाचे प्रमाणपत्र देण्यासाठी लाच मागितल्याची बाब माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अधिकारी यांचेकडून प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र देण्याच्या कामात गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुंषगाने दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०८-२०२३) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने फौजदारी गुन्हा दाखल झाल्याने, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने संबंधीत दोन्ही अधिकारी यांना दिनांक ०१/०७/२०२२ रोजीच्या आदेशान्वये दिनांक २८/०६/२०२२ (मध्यान्होत्तर) पासून निलंबित केले आहे. दोन्ही अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू आहे .
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय नव्या जागेत स्थंलातरीत करण्याबाबत

**(२२) ५९०७७ (२१-०४-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली येथील वसंतदादा पाटील औद्योगिक वसाहतीतील भाडेतत्वावरील जागेत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अनेक वर्षापासून सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे येथील नवीन आरटीओ कार्यालयासाठी जागा निश्चित इमारतीचे नुतनीकरण ही करण्यात आले असतानाही नव्या जागेत कार्यालय स्थंलातर झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील आरटीओ कार्यालय नवीन जागेत स्थंलातरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) जिल्हाधिकारी, सांगली यांनी त्यांच्या दि.२३.०८.२०१८ रोजीच्या आदेशानुसार मौजे सांगली गट क्र. १३८,१३९,१४०/२ मधील ४४.७६ आर जमीन व त्यावरील बांधकाम असलेली इमारत यांचे सह उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली यांना हस्तांतरीत केले आहे. सदर हस्तांतरण मा. विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्योत्तर मंजूरी व ते ज्या अटी व शर्ती विहित करतील यांचे अधीन राहून करण्यात आले आहे.
सदर जमीन व त्यावरील बांधकाम असलेली इमारत यांचा तलाठी व मंडल अधिकारी, सांगली यांनी दि.३०.०८.२०१८ रोजी ताबा दिला असून ७/१२ अभिलेखावर उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सांगली यांचे नावे नोंद घेण्यात आली आहे.
सदर इमारतीमध्ये कार्यालय सुरु करण्याकरीता आवश्यक बांधकाम, वायरिंग व इतर कामकाजासाठी रु. ४६,७०,८००/- इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास दि.१५.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.
उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मिरज यांनी जा. क्र. मिरज/४१३/२०२३, दि. १८. ०५. २०२३ रोजीच्या पत्राव्दारे सांगली कार्यालयाच्या इमारतीची पाहणी करण्यात असल्याचे व उक्त ठिकाणी इमारत डागडूजी (दरवाजे, खिडक्या), कंपाऊंड वॉल करणे, विस्कळीत करण्यात आलेली विद्युत संच मांडणी दुरुस्त करणे इत्यादी कामे बाकी आहे. त्यामुळे स्थापत्य कामे अंतिम टप्यात असताना विद्युतीकरणाचे काम हाती घेणे योग्य ठरणार असून विद्युत कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन घेण्यात येत आहे. उपरोक्त कारणाने अद्याप उप प्रादेशिक परिवहन सांगली कार्यालयाने इमारतीचा ताबा घेण्यात आलेला नाही. उप प्रादेशिक अधिकारी, सांगली याबाबत उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, मिरज यांचेकडे सदर कामाबाबत पाठपुरावा करीत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील पश्चिम उपनगर भागांतील पडझड झालेल्या नाल्यांची डागडुजी करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने निविदा मागविल्याबाबत

**(२३) ५९४५३ (२१-०४-२०२३). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पश्चिम उपनगरातील वांद्रे पश्चिमेसह खार, सांताक्रूझ, विलेपार्ले, अंधेरी, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर आदी भागांतील पडझड झालेल्या नाल्यांची डागडुजी करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने निविदा मागविल्या असून तब्बल ५६ कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केव नाल्यांच्या डागडुजीसाठी ५६ कोटी रुपये खर्च करत असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी व राजकीय पक्षांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदरहू नाल्यांवर कोट्यावधी रुपये खर्च करण्याची कारणे काय आहेत तसेच सदरहू निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने योग्य खर्चाच्या निविदा काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) व (२) मुंबईच्या पश्चिम उपनगरातील वांद्रे (पश्चिम), खार, सांताक्रुझ, विलेपार्ले, अंधेरी, गोरेगांव, मालाड, कांदिवली, बोरीवली, दहिसर आदी भागांतील नाल्यांचे रुंदीकरण करणे, आर.सी.सी. भिंत बांधणे, पर्जन्य जलवाहिन्यांचे रुंदीकरण करणे अश्या स्वरुपाची २५ विकासकामे प्रस्तावित असून, त्यापैकी १८ कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यादेश देण्यात आले आहेत व ७ कामांची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील कचऱ्यावर करावयाच्या पुनर्प्रक्रियेबाबत

**(२४) ५९९५३ (२२-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे कचऱ्यापासून बायोगॅस, कंपोस्ट खत तयार करण्यात येईल अशी घोषणा शासनाकडून सुमारे १० ते ११ महिन्यापूर्वी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या घोषणेला माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये सुमारे १० महिने होवूनही निविदा प्रक्रिया पूर्ण होवू शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेवून येथील कचऱ्यावरील रिसायकलिंगबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) व (२) नागपूर महानगरपालिकेमार्फत भांडेवाडी येथे दैनदिन येणाऱ्या १०००+२० टक्के कचऱ्यावर प्रक्रिया करुन त्यांची योग्यरित्या विल्हेवाट लावण्याकरिता दि.१३ मार्च,२०२२ ला अंतरराष्ट्रीय पातळीवर निविदा बोलविण्यात आल्या होत्या. यामध्ये प्राप्त निविदाची तांत्रिक समितीमार्फत तपासणी करुन

प्राप्त मंजूरी नंतर आर्थिक निविदा उघडण्यात आल्या यामध्ये M/s.SusBDe Holding B.V. (JV) यांची निविदा स्वीकृत करण्यात आली असून त्यांच्या बरोबर करारनामा व विहित कार्यवाही करण्याची बाब नागपूर महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(३) नागपूर महानगरपालिकेमध्ये पहिल्या टप्प्यात १० लक्ष टन जुन्या कचऱ्यावर बायोमाईनिंग प्रक्रिया करण्यात आली असून दुसरा टप्पा जानेवारी, २०२२ मध्ये सुरु करण्यात आला आहे. यामध्ये २.३२ लक्ष मेट्रीक टन जून्या कचऱ्यावर बायोमाईनिंग प्रक्रिया करण्यात आली असून सदर प्रकल्प डिसेंबर,२०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय महामार्ग ५४८ (सी) खामगाव ते पंढरपुर (माजलगाव ते केज, जि.बीड )**
**या महामार्गातील रस्त्याचे व घाटाचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(२५) ६००३३ (२४-०४-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महामार्ग ५४८ (सी) खामगाव ते पंढरपुर तसेच माजलगाव ते परतुर (माजलगाव ते केज, जि.बीड) या महामार्गातील रस्त्याचे व घाटाचे काम अपूर्ण असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, औरंगाबाद यांना निवेदन दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१४-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राष्ट्रीय महामार्ग माजलगाव ते केज या पॅकेजचे काम पुर्ण झालेले आहे. परतूर ते माजलगाव व पॅकेजचे बांधकाम प्रगतीपथावर असून सिमेंट काँक्रिटीकरण (PQC) चे ९३% (४६.४८ कि.मी.) काम पुर्ण झालेले आहे. उर्वरीत ३.९९ कि.मी.चे काम भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण होताच तात्काळ हाती घेण्यात येईल.

---

**पुणे महानगरपालिका येथील फरसुंगी व ऊरळी देवाची या दोन**
**गावांची स्वतंत्र नगरपालिका करण्याबाबत**

**(२६) ६०१२१ (११-०५-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिका हद्दीतील फुरसुंगी व ऊरळी देवाची या दोन गावांची स्वतंत्र नगरपालिका करण्याचे शासनाने जाहीर केले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेवून उपरोक्त नगरपालिका स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०९-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) सदर दोन्ही गावे महानगरपालिका हद्दीतून वगळून दोन गावांसाठी स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याच्या अनुषंगाने दि. ३१.०३.२०२३ रोजी उद्घोषणा प्रसिध्द करण्यात आली आहे. तथापि, गावे महानगरपालिकेतून न

वगळण्याबाबत मा. उच्च न्यायालय,मुंबई येथे जनहित याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. सदर याचिकांचा निकाल दि. २१.०८.२०२३ रोजी लागला असून मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## चेंबूर (मुंबई) येथील विश्रामबागेतील बैठ्या चाळीच्या निर्मूलनासाठी मूळ जागा मालक व मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार

**(२७) ६१३१८ (११-०५-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील विश्रामबागेतील बैठ्या चाळीच्या निर्मुलनासाठी मूळ जागा मालक व मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी टॅक गैरव्यवहार करीत भाडेकरुंची आणि मा.सर्वोच्च न्यायालयाची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने बांधकाम तोडण्याच्या दिलेल्या आदेशात नमूद असलेल्या ९० वर्षे जुन्या तीन मजली तीन इमारती अस्तित्वातच नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चेंबूर येथील विश्रामबागेतील बैठ्या चाळी तोडण्यासाठी हा सर्व कट मूळ जागामालक व मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी रचला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सर्वंकष चौकशी करुन मा.सर्वोच्च न्यायालयाची फसवणूक करण्यास जबाबदार असलेल्या संबंधितांची चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालामध्ये सदर ठिकाणी तळमजला, तळमजला + पहिला मजला आणि तळमजला + ०२ मजला अशी अस्तित्वात असणारी तीन बांधकामे धोकादायक असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

(३) व (४) तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालातील अतिधोकादायक बांधकामातील बहुतांश रहिवाशांनी त्यांची घरे स्वमताने जागा मालकाशी करार करुन रिकाम्या घराचा ताबा जागा मालकाच्या स्वाधीन केला आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एका रहिवाशाने स्वत:चे घर खाली करुन ताबा जागा मालकाकडे सुपूर्द केला आहे. सदर इमारतीतील उर्वरित ४ रहिवाशांना मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३०.११.२०२२ रोजीच्या आदेशानुसार ४ आठवड्यांमध्ये घरे खाली करण्याचे बजाविले आहे.

सदर रहिवाशांनी मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरोधात मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष रजा याचिका मा. न्यायालयाने दिनांक ०९.०१.२०२३ रोजी खारीज केल्या आहेत. तसेच, याचिकाकर्ता यांना त्यांच्या राहण्याच्या पर्यायी व्यवस्थेबाबत योग्य त्या अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने सुचविले आहे. परंतु धोकादायक असलेल्या सदर इमारतीतील उर्वरित रहिवाशी बृहन्मुंबई महानगरपालिकेस सहकार्य करत नसल्याचे आढळले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर प्रकरणी तोडगा काढण्याकरिता दिनांक २८.०२.२०२३ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत तात्पुरता निवारा / घरभाडे याबाबत जागा मालक व भाडेकरु यांच्यामध्ये एकमत झाले नाही. तद्नंतर मा. लोकायुक्त यांच्याकडे दिनांक २८.०४.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीत, दिनांक १९.०५.२०२३ रोजीच्या पुढील सुनावणीपर्यंत "जैसे थे" आदेश पारित केले आहेत.

तथापि सदर धोकादायक बांधकामांमधील रहिवाशांची तसेच आजुबाजूच्या पादचाऱ्यांची जीवित व वित्त हानी टाळण्याच्या दृष्टीने रिट याचिका क्रमांक ११३५/२०१४ मधील मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करुन व मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील चेंबूर येथील साईकृपा इंडस्ट्री येथे मिठागर प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(२८) ६१३२८ (११-०५-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील साईकृपा इंडस्ट्री, छेडानगर क्रॉस रोड, पी.एल.लोखंडे मार्ग, चेंबूर येथे मिठागर प्राधिकरणाच्या मालकिच्या जागेवर अनधिकृत बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुंबई महानगरपालिकेकडे लेखी निवेदनाव्दारे दिनांक ९ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अनधिकृत बांधकामाबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१), (२), (३) व (४) अशा आशयाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे.

त्याअनुषंगाने सदर भूखंडास अतिक्रमणापासून प्रतिबंधित करण्यासाठी संरक्षक भिंत बांधण्याबाबत, तसेच सदर भूखंडावरील अनधिकृत बांधकामांवर निष्कासन कारवाई आयोजित करण्यास आवश्यक ती मनुष्यबळ व यंत्रसामुग्री पुरविण्यात येईल असे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मिठागर प्राधिकरण, भारत सरकार यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट उपनगरातील गावे एकत्रित करून स्वतंत्र महापालिका स्थापन करणेबाबत

**(२९) ६१५५७ (११-०५-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरालगत असलेल्या उपनगरातील ३४ गावे टप्प्याटप्प्याने पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्व भागात असलेल्या गावांचे क्षेत्रफळ, लोकसंख्येच्या मानाने पुणे महानगरपालिकेची सध्याची यंत्रणा अपूरी असून नव्याने समावेश केलेल्या गावांच्या विकासाकडे महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असून या गावांना वेळेवर आवश्यक उपाययोजना व सुविधा पुरविण्यात अडचणी निर्माण होत आहेत तसेच नागरिकांचे सार्वजनिक हिताचे प्रश्न वेळेवर मार्गी लागत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुणे शहरालगत असलेल्या उपनगरातील गावे पूर्व हवेलीसाठी स्वतंत्र हडपसर वाघोली महानगरपालिका स्थापन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. पुणे महानगरपालिकेमार्फत विविध सोयीसुविधा देणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) हडपसर वाघोली महानगरपालिका स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहराचा सन २०१५ मध्ये स्मार्टसिटी मध्ये समावेश करण्यात आल्याबाबत

**(३०) ६१७६३ (२४-०४-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहराचा सन २०१५ मध्ये स्मार्टसिटी अंतर्गत समावेश करण्यात आल्यानंतर पारडी, भांडेवाडी, पुनापुर, भरतवाडा येथील १,७३० एकर परिसराची निविदा श्योर प्रकल्प अंतर्गत सर्वप्रथम सन २०१८ मध्ये शापूरजी पालोनजी कंपनीला रस्ते निर्माणाचे टेंडर देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काम ६ वेगवेगळया विभागात वाटुन देण्यात आल्यसानंतर निविदा मागविण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कारणास्तव रस्त्याच्या कामाला विलंब होत असल्याने वाहतुकीची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.

मे.शापूरजी पालेनजी यांना सदर कामाकरिता दिनांक १०/१०/२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आला होता.

(२) हे खरे आहे.

मे.शापूरजी पालेनजी कंपनी प्रायव्हेट लिमिटेड यांच्या करारनामा दिनांक ३०/०६/२०२२ रोजी संपुष्टात आला असल्याने त्यांनी हाती घेतलेल्या कामापैकी काही ठिकाणी काम अर्धवट असल्याने सदर काम पुर्ण करण्याकरिता त्याचे ६ भागात विभाजन करुन निविदा प्रक्रीया राबविण्यात आली आहे.

(३) व (४) मे.शापूरजी पालेनजी यांना देण्यात आलेले काम व त्यांनी हाती घेतलेले काम पुर्ण न केल्यामुळे सदर कामाकरिता पुन्हा निविदा मागविण्यात आल्या. निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली असून कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर काम दिनांक ०८/११/२०२३ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर ते शिर्डी पर्यंतचा समृद्धी महामार्गलगत सुविधा केंद्र उभारण्यास विलंब होत असल्याबाबत

**(३१) ६१९६९ (२५-०४-२०२३). श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे बांधलेल्या नागपूर ते शिर्डी पर्यंतचा समृद्धी महामार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला असून या महामार्गावर आवश्यक सुविधा प्रदान करणारी सुविधा केंद्रे अद्यापही उभारली नसल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाने महामार्ग खुला झाल्याच्या एक महिन्यानंतर सुविधा केंद्र स्थापनेची निविदा प्रसिध्द केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुषंगाने नियमानुसार समृद्धी महामार्गावर जबाबदार कंपनीने पायाभूत सुविधा विकसित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१३-०९-२०२३) :** (१) खरे आहे. तथापि, निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने असे झाले आहे.

(२) प्रथम निविदा सुचना महामार्ग खुला करण्याच्या आधीच प्रसिध्द केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेतील कंत्राटदार कंपनीने आपली चिकित्सा योजनेतंर्गत चाचणीमागे २०० रुपये आकारुन केलेली महानगरपालिकेची आर्थिक फसवणूक

**(३२) ६२००७ (११-०५-२०२३). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने सन २०१८ मध्ये ''आपली चिकित्सा'' ही आरोग्य विभागातील योजना सुरु केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत महानगरपालिकेने यापूर्वी नेमलेल्या कंत्राटदार कंपनीने आपली चिकित्सा या योजनेतंर्गत एका व्यक्तीच्या चाचणीमागे २०० रुपये आकारुन महानगरपालिकेची लूट केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन दोषी आढळून येणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी माजी नगरसेवकांनी मा.मुख्यमंत्री तसेच महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने सदर प्रकरणात दोषी आढळून येणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर योजनेअंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रुग्णांकडून मुलभूत रक्त चाचण्यांसाठी रु. ५०/- व प्रगत रक्त चाचण्यांसाठी रु. १००/- इतका दर आकारला जातो.

(३) असे कोणतेही निवेदन बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील महानगरपालिकेच्या नवलकर मंडईच्या पुनर्विकासाबाबत

**(३३) ६२३०० (११-०५-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) रेल्वे स्थानकाजवळील अतिधोकादायक अवस्थेत असणाऱ्या महानगरपालिकेच्या नवलकर मंडईच्या पुनर्विकास सन २०१५ पासून आजतागायत प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विविध आयुधांद्वारे तसेच आयुक्त तथा प्रशासक, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याकडे पत्रव्यवहार करुन सातत्याने पाठपुरावा करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भात उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देतांना अंतिम मंजुरीकरिता प्रस्ताव इमारत विभागाकडे पाठविण्यात आल्याचे नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवलकर मंडईच्या पुनर्विकासास तात्काळ मंजुरी देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) नवलकर मंडईच्या पूर्वीच्या आराखड्यास आवश्यक सवलतींना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागामार्फत मंजुरी मिळाली आहे. तद्नंतर रेल्वे प्राधिकरणाने सुचविल्यानुसार सदर आराखड्यात सुधारणा करुन सुधारीत आराखडे रेल्वे प्राधिकरण व इमारत प्रस्ताव विभागाकडे अंतिम मंजुरीकरिता पाठविण्यात आले आहेत.

सुधारीत आराखड्यास अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर मंडईच्या पुनर्विकासाकरिता कंत्राटदार नेमणुकीसाठी ई-निविदा मागविण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**छत्रपती श्री.राजाराम उद्यान, जोगेश्वरी (पूर्व) जवळील सुलभ शौचालयाची जागेवर विकासकाने कब्जा केल्याबाबत**

**(३४) ६२३०८ (११-०५-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील छत्रपती श्री.राजाराम उद्यान, जवळील सुलभ शौचालय एसआरए मार्फत चाळीचा विकास करणाऱ्या विकासकाने तोडल्याने रहिवाशांना होणाऱ्या गैरसोईबाबत तसेच विकासक हे शौचालय स्वतःच्या प्लॉटमध्ये न बांधता मनपाच्या उद्यानात शौचालय बांधून पूर्वीची शौचालयाची जागा बालकवित असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान सहायक आयुक्त, के/पूर्व विभागीय कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार दोषी विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर सुलभ शौचालय झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये बाधित होत होते. विकासकाकडून रु. १३.६६ लाख इतका बांधकाम खर्च वसूल करुन सदर शौचालय निष्कासित करण्याकरिता ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

सदर शौचालयाचा वापर करणाऱ्या नागरिकांसाठी जवळच्या परिसरात पर्यायी शौचालयाची व्यवस्था आहे. तसेच सद्य:स्थितीत छत्रपती श्री राजाराम उद्यान येथे विकासकामार्फत शौचालयाचे कोणतेही बांधकाम सुरु नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुलुंड- गोरेगाव हा जोड रस्ता प्रकल्प अद्याप अपूर्ण असल्याबाबत**

**(३५) ६२४०२ (२४-०४-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुलुंड- गोरेगाव हा जोड रस्ता प्रकल्प पाच वर्षापूर्वी मंजूर होऊनही अद्याप पूर्ण झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प प्रलंबित राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरचा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) व (२) मुंबईतील गोरेगांव-मुलुंड (जी.एम.एल.आर.) हा पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणारा १२.२० कि.मी. लांबीचा जोडरस्ता प्रकल्प चार टप्प्यांमध्ये प्रस्तावित आहे.

सदर प्रकल्प प्रलंबित राहण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत:-

पहिला टप्पा – भूसंपादन प्रक्रियेमुळे काम सुरु होण्यास विलंब तसेच रेल्वेच्या पुलाच्या कामामुळे पोहोच रस्त्याच्या कामांमध्ये विलंब झाला.

दुसरा टप्पा – अतिक्रमण निष्कासित करण्याच्या गतीनुसार रुंदीकरणाचे काम बाधीत होत गेले.

तिसरा टप्पा – वन खात्याकडील मंजुरीकरिता प्रादेशिक अधिकार प्राप्त समितीच्या अटींनुसार,

१. पर्यायी वनीकरणासाठी १९.८३ हेक्टर बिगर वनजमिनीचे भूसंपादन करणे

२. आय.आय.टी. मुंबईमार्फत तुळशी आणि विहार जलाशयामधील भूजल प्रवाह अनुरुपणाचा अभ्यास करुन प्रस्तावित बोगद्यांचा त्यावर होणारा संभाव्य परिणाम तपासणे

३. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामाधील जैवविविधतेचा बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यासारख्या नामांकित तज्ञ संस्थेमार्फत अभ्यास करुन बोगद्याच्या बांधकाम कालावधीत आणि बोगदा कार्यान्वित झाल्यानंतर होणारा परिणामाचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सुचविणे

४. इतर आवश्यक कामांमध्ये कोविड-१९ साथीच्या आजारामुळे खंड पडणे.

(३) सदर प्रकल्प पूर्ण करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली / येत आहे:-

• पहिला टप्पा – नाहूर रेल्वे पुलाच्या पोहोच रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सन २०१८ पासून सुरु आहे. रेल्वे हद्दीतील पुलाचे काम रेल्वेमार्फत सुरु आहे.

• दुसरा टप्पा – पूर्व द्रुतगती मार्ग ते तानसा पाईप लाईन व पश्चिम द्रुतगती मार्गावरील ओबेरॉय मॉल ते फिल्मसिटी गेट येथील रस्ता रुंदीकरणाचे काम सन २०१८ पासून सुरु आहे.

• तिसरा टप्पा – पश्चिम उपनगरातील फिल्मसिटी रस्त्यावरील १.२६ कि.मी. चा उड्डाणपुल व पूर्व उपनगरातील तानसा पाईप लाईन ते नाहूर पर्यंत १.८९ कि.मी. च्या उड्डाणपुलाचे काम सन २०२२ पासून सुरु आहे आणि ४.७ कि.मी. च्या दुहेरी बोगद्याच्या कामाची निविदा मागविण्यात आली आहे.

• चौथा टप्पा – पश्चिम द्रुतगती मार्गावरील वाहतुक सुधारणा आणि वाहनासाठी भुयारी मार्ग व पूर्व द्रुतगती महामार्गावरील द्वितीय स्तरीय उड्डाणपुलाचे काम तिसऱ्या टप्प्यातील बोगद्याचे काम सुरु झाल्यानंतर करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नगरपरिषद, माजलगाव (जि.बीड) येथील तत्कालीन नगराध्यक्षांनी स्थायी समितीची बोगस सभा दाखवून ठराव पारित केल्याबाबत

**(३६) ६२९३६ (११-०५-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपरिषद माजलगाव (जि.बीड) स्थायी समिती ठराव क्रमांक ४३ ते ४९ महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायत औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३०८ अन्वये तहकूब करण्याबाबत मुख्याधिकारी, माजलगाव नगरपरिषद जि.बीड यांनी दिनांक ४ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना अहवाल दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन नगराध्यक्षांनी दिनांक १७ डिसेंबर, २०२१ रोजी स्थायी समितीची बोगस सभा दाखवुन ठराव क्रं. ४३ ते ४९ पारित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन नगराध्यक्षांनी नियमबाह्य पध्दतीने बोगस ठराव संमत करुन नगरपरिषदेची व शासनाची दिशाभूल करणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे, असे मुख्याधिकारी यांनी दिलेल्या अहवालात नमूद केले आहे काय,

(४) असल्यास, सदरहू अहवालाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) मुख्याधिकारी, माजलगाव नगरपरिषद यांच्या अहवालानुसार स्थायी समितीने दि.१७ डिसेंबर, २०२१ रोजी सभा घेऊन ठराव क्र. ४३ ते ४९ पारित केल्याबाबतची नोंद सभा इतिवृत्तांत नोंदवहीमध्ये घेतली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दि.२८ जून, २०२३ रोजी संबंधितांची सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीमध्ये मुख्याधिकारी, माजलगाव नगरपरिषद यांचा अर्ज व तद्नुषंगिक अभिलेख विचारात घेऊन, सदर ठराव क्र. ४३ ते ४९ तहकुब करण्याबाबत विहित कालावधीमध्ये अर्ज सादर न केल्यामुळे मुख्याधिकारी, माजलगाव नगरपरीषद यांचा अर्ज जिल्हाधिकारी, बीड यांच्या दि.२८ जून, २०२३ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेतील उड्डाणपूल व ग्रेड सेपरेटर च्या कामात होतं असलेल्या विलंबाबाबत

**(३७) ६२९७६ (१२-०५-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात गेल्या तीन आर्थिक वर्षांपासून विश्रांतवाडी, नगर रस्ता शास्त्री चौक आणि खराडी बायपास चौक येथे उड्डाणपूल व ग्रेड सेपरेटर उभारण्यासाठी निधी तरतूद केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तीनही उड्डाण पुलांचा सविस्तर आराखडा (डीपीआर) तयार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी निधीची तरतूद करण्यात येऊनही पुलाच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२३) :** १) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) १. विश्रांतवाडी चौक- या ठिकाणी उड्डाणपूल / ग्रेडसेपरेटर बांधणेसाठी पुणे महानगरपालिकेमार्फत तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली असून याबाबतचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला आहे. तसेच या ठिकाणी महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि.,यांचेमार्फत एच.सी.एम.टी.आर.चा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून विश्रांतवाडी चौकातून एच.सी.एम.टी.आर. ( निओ मेट्रो ) मार्गिका प्रस्तावित केलेली आहे. तसेच या ठिकाणी चौकालगत संरक्षण विभागाचा टँकरोड अस्तित्वात आहे.

२. नगर रस्ता शास्त्री चौक - या चौकात उड्डाणपूल / ग्रेडसेपरेटर बांधणेसाठी पुणे महानगरपालिके मार्फत प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून सदर चौकालगत आगाखान पॅलेस ही पुरातत्व विभागाची वास्तू असल्याने सदर ठिक्राणी उड्डाणपूल / ग्रेडसेपरेटर बांधणेसाठी पुरातत्व विभागाच्या परवानगीची आवश्यकता असल्याने याबाबत पुरातत्व विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला असून अद्यापपर्यंत पुरातत्व विभागाचे ना हरकत पत्र प्राप्त झालेले नाही.

३. खराडी बायपास - या चौकामध्ये उड्डाणपूल / ग्रेडसेपरेटर बांधणेसाठी पुणे महानगरपालिके मार्फत तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली असून याबाबतचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला आहे. राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत खराडी चौकाचे अलिकडे ६०० मी. अंतर ते शिरूर पर्यंत उन्नत मार्गाचा डी.पी.आर. तयार करण्यात आलेला आहे. मेट्रो विभागामार्फत रामवाडी ते वाघोली अशी विस्तारीत मार्गिका प्रस्तावित केलेली असून त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला असून खराडी बायपास चौकामधून मेट्रो मार्गिका प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

वरील सर्व ठिकाणच्या चौकामध्ये उड्डाणपूल / ग्रेडसेपरेटर बांधण्यासाठी महामेट्रो विभाग, राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व पुणे महानगरपालिका यांनी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालावर एकत्रित चर्चा / अभ्यास करून तसेच निधी उपलब्धतेनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या खाजगी ठेकेदारांच्या वतीने चालवलेल्या बसच्या अपघाताच्या संखेत वाढ होतं असल्याबाबत**

**(३८) ६२९८७ (१२-०५-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगर पालिकेच्या खाजगी ठेकेदारांच्यावतीने चालवलेल्या बसच्या अपघात संख्येत गेल्या दहा महिन्यात लक्षणीय वाढ झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत तीन आर्थिक वर्षात पुणे महानगर पालिकेच्या बसेसद्वारे झालेल्या अपघातात किती नागरिक जखमी व मृत्युमुखी पडले आहेत,
(३) असल्यास अपघातातील जखमी व मृतांच्या कुटुंबियांना पुणे महानगरपालिकेच्या निकषानुसार मदत करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, अपघातांचे प्रमाण कमी होण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यासाठी शासनाने पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनाला आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२३) :** (१) खाजगी ठेकेदारांकडील बसेसकडून झालेले गत तीन वर्षातील अपघात माहिती.

| सन | अपघातसंख्या |
|---|---|
| २०१९-२० | ५१ |
| २०२०-२१ | १६ |
| २०२१-२२ | ३३ |
| जाने.,२०२३ पर्यंत | ५९ |

(२) गत तीन आर्थिक वर्षात तसेच मागील दहा महिन्यांत महामंडळाच्या बसेसद्वारे १६७ नागरीक जखमी झाले असून ३० नागरीक मृत्युमुखी पडले आहेत, तसेच महामंडळाकडील ठेकेदारांच्या बसेसद्वारे १५४ नागरीक जखमी झाले असून ३५ नागरीक मृत्युमुखी पडले आहेत.
(३) संचालक मंडळाच्या ठरावानुसार जखमी व्यक्तिला तातडीची आर्थिक मदत म्हणून ५०,०००/- व मयत व्यक्तिंचे वारसदार यांना २,००,०००/- इतकी मदत देण्यात येते. तसेच, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, यांचेकडून दावा निकाली लागल्यानंतर जखमींना व मयतांचे वारसदारांना निकाली दाव्यातील आदेशाप्रमाणे रक्कम दिली जात असून गत तीन वर्षातील दावा निकालानंतर दिलेली रक्कम खालीलप्रमाणे.

| सन | देण्यात आलेली रक्कम |
|---|---|
| २०१९-२० | ३,५१,८८,३१३/- |
| २०२०-२१ | १,१९,३६,६७१/- |
| २०२१-२२ | ५४,८२,९११/- |
| २०२२ - २३ | २,२१,०१,६९५/- |

तसेच, ठेकेदारांकडील बसेसचा विमा असल्याने त्यांचे बस अपघांतामधील जखमी व मयतांचे वारसदार यांना संबंधित

विमा कंपनीकडून मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, यांचेकडून निश्चित करण्यात आलेली रक्कम दिली जाते.
(४) महामंडळामार्फत बसचालकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रावस्ती नगर (परभणी) येथील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याबाबत

**(३९) ६३२७७ (१२-०५-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथील विकास नगरातील श्रावस्ती नगर, गंगाखेड रोड येथे नकाशात दशविलेल्या रस्त्यावर अतिक्रमण करुन प्रशासनाच्या संगनमताने बांधकाम करुन हा रस्ता बंद केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे या विरोधात येथील रहिवाशांनी जिल्हाधिकारी, परभणी यांना दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी निवेदन देऊन साखळी उपोषण केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या रस्त्यांवरील अतिक्रमाणांवर कोणती कार्यवाही कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) रहिवाश्यांनी उपोषण केले हे खरे आहे.
(३) सहायक संचालक, नगर रचना यांच्यामार्फत रस्त्यावरील अतिक्रमित जागेचे रेखांकन करुन विभाग प्रमुख, रमाई आवास योजना, अनधिकृत बांधकाम नियंत्रण समिती व पोलीस बंदोबस्तासह दिनांक २९ मे,२०२३ रोजी अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील अंधेरी-कुर्ला मार्गावरील सफेद पूलाच्या पुनर्बांधणीबाबत

**(४०) ६३६०९ (१२-०५-२०२३). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील अंधेरी-कुर्ला मार्गावरील सफेद पूल अरुंद असल्याने प्रचंड वाहतुक कोंडी निर्माण होते, सदरच्या सफेद पूलाची पुनर्बांधणी करण्याचा निर्णय माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्याप सफेद पूलाच्या पुनर्बांधणीच्या कामास सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, तातडीने सफेद पूलाची पुनर्बांधणी करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) अंधेरी-कुर्ला मार्गावरील सफेद पूल नाल्यावरील पुलाच्या पुनर्बांधणीच्या कामाचे कार्यादेश दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी नियुक्त कंत्राटदाराला देण्यात आले असून, सदर काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील लहान मुलांमध्ये क्षयरोगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असल्याबाबत

**(४१) ६४०९९ (१२-०५-२०२३). श्री.गणेश नाईक (ऐरोली), अ‍ॅड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लहान मुलांमध्ये क्षयरोगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने प्रत्येकी १० मुलामागे एकाला क्षय रोगाची लागण झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलांमध्ये होणाऱ्या क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी महानगरपालिका आणि राज्य शासनाने संयुक्त मोहिम राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०८-२०२३) :** (१) मुंबईतील लहान मुलांची संख्या अंदाजे ४६,११,४२० इतकी असून, त्यापैकी ५३३० इतकी क्षयबाधीत बालरुग्ण आढळून आले आहेत.

त्यानुसार अंदाजे ८७० मुलांमागे एकाला क्षयरोगाची लागण झाली असल्याचे आढळते.

(२) राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका व राज्य शासन यांची संयुक्त मोहिम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत खालीलप्रमाणे आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात:-

• निदानाकरिता संशयित रुग्णाचे, थुंकीचे CBNAAT, कल्चर आणि DST तसेच LPA चाचणी करण्यात येते.

• क्ष-किरण, CT Scan, MRI, सोनोग्राफी, Bronchial Lavage या सुविधा एक्स्ट्रा पल्मोनरी टीबीच्या चाचणीकरिता उपलब्ध आहेत.

• औषधसंवेदनशील क्षयरोगाकरिता FDC उपचार तसेच औषध प्रतिरोधिक क्षयरोगाकरिता Bedaqulin सारखी नवीनतम औषधे इत्यादी उपलब्ध आहे.

• उपचारादरम्यान गुंतागुंतीची शक्यता उद्भवल्यास उपचाराकरिता लागणारे ADR Clinic सर्वसाधारण रुग्णालयांमध्ये उपलब्ध करण्यात आलेली आहेत.

• खाजगी दवाखाने व रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांकरिता सार्वजनिक-खाजगी सहभागांतर्गत सर्व प्रकारच्या चाचण्या, उपचार नि:शुल्क उपलब्ध आहे.

• वाडिया बाल रुग्णालय व जे.जे. रुग्णालयात लहान मुलांकरिता विशेष रुग्णसेवा, आंतररुग्ण सेवा तसेच अतिदक्षता विभागाची सोय करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे येथील कळवा-ऐरोली उन्नत रेल्वे पुलाच्या कामात बाधित होणाऱ्या रहिवाशांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(४२) ६४७०९ (३१-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील कळवा-ऐरोली उन्नत रेल्वे पुलाच्या कामात बाधित होणाऱ्या परिसरातील झोपडपट्टीतील रहिवाशांचे एकत्रितपणे परिसरातच पुनर्वसन करण्याची मागणी भोलानगर रहिवासी गृहनिर्माण एकता संघ तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी वारंवार मा.मुख्यमंत्री यांचेकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी केलेली आहे काय, यानुसार कळवा-ऐरोली उन्नत रेल्वे पुलाच्या कामात बाधित होणाऱ्या झोपडपट्टीतील रहिवाशांचे एकत्रितपणे परिसरातच पुनर्वसन करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०९-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

भोलानगर रहिवाशी गृहनिर्माण एकता संघ यांच्याऐवजी श्री. बालाजी को. ऑप.हौ.सो. (नियोजित) न्यु शिवाजी नगर, कळवा (पूर्व) या संस्थेमार्फत त्याच परिसरात एकत्रितपणे पुनर्वसन करावे अशी मागणी करण्यात आली आहे.

(२) ठाणे येथील कळवा-ऐरोली उन्नत रेल्वे पुलाच्या बांधकामामुळे बाधित होणा-या रहिवाश्यांचे एकत्रितपणे त्याच परिसरात पुनर्वसन करण्याकरीता एकूण १०६७ सदनिका आवश्यक आहेत. सद्यस्थितीत त्याच परिसरात सदनिका उपलब्ध नाहीत. मे. दोस्ती डेव्हलपर्स बाळकूम ठाणे येथील ११०० सदनिका ऐरोली-कळवा उन्नत रेल्वे प्रकल्पासाठी देण्याचा पर्याय सदर प्रकल्प बाधितांना देण्याचे नियोजित होते. तथापि, मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ०३.०४.२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ऐरोली–कळवा उन्नत रेल्वे प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे त्या जागी पुनर्वसन करावे व पुनर्वसन होत नाही तोपर्यंत त्यांना भाडे द्यावे, याबाबतची अंमलबजावणी मध्य रेल्वे / मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन व एमएमआरडीएने करावी असे निर्देश दिले आहेत. त्यामुळे भोलानगर कळवा येथील रहिवाशी यांनी त्याच जागेवर पुनर्वसन करावे अशी भूमिका घेतल्याने सद्यस्थितीत भोलानगर येथील रहिवाशांचे पुनर्वसन प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे लाखो रुपये खर्च करुन निकृष्ट दर्जाचे बंधारे बांधल्याने भूजल पातळीत घट झाल्याबाबत

**(४३) ६४९३३ (३१-०८-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (ता.शहापूर, जि.ठाणे) या दुर्गम व डोंगराळ तालुक्यात गत ३ वर्षापासून जलसंधारण, वन विभाग, कृषी विभाग, लघुपाटबंधारे या विविध विभागामार्फत तयार करण्यात आलेले बंधारे ठेकेदार व अधिकारी यांच्या बेजबाबदारपणा व विलंबामुळे दिवसा ऐवजी रात्रीच्या अंधारात निकृष्ट दर्जाचे बंधारे बांधण्याची कामे केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करोडो रुपये खर्च करुनही निकृष्ट व बनावट बांधकामामुळे बंधाऱ्याची भूजल पातळी घटली असून, तेथील नागरिकांच्या पाण्याच्या प्रश्न न सुटल्याने नागरिकांना ३ ते ४ किमी अंतरावरुन पाणी आणावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चांगल्या दर्जाचे केटी टाईप बंधारे बांधण्याचे प्रस्ताव फक्त कागदपत्री असून, अद्यापी एकही बंधारा अंदाजपत्रकाप्रमाणे बांधला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी ठेकेदार व संबंधित विभागांच्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

ठाणे विभागांतर्गत मागील वर्षात पुर्ण करण्यात आलेली ३ बंधाऱ्यांची कामे सुस्थितीत आहेत व याबाबत बंधाऱ्यांची कोणतीही तक्रार शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्सोवा (अंधेरी, मुंबई) ते विरार पर्यंतच्या सी-लिंक चे काम पूर्ण करुन विरार ते पालघर सी-लिंक (सागरी सेतू) वाढविण्याबाबत

**(४४) ६६२३६ (३०-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्सोवा, अंधेरी (मुंबई) ते विरार पर्यंतच्या सी-लिंक (सागरी सेतू) चे काम गत वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विरार ते पालघर सी-लिंक वाढविण्यासंदर्भात मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाने अहवाल तयार करुन शासनास माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सी-लिंक (सागरी सेतू) चे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०९-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्राधिकरणाच्या दिनांक २०.१०.२०२२ रोजी झालेलल्या १५३ व्या बैठकीत वर्सोवा-विरार सागरी सेतु प्रकल्प उभारण्यास कार्यन्वयीन यंत्रणा म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा ऐवजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण निश्चित करण्यात आलेले आहे. वर्सोवा-विरार सागरी सेतु प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानुसार प्रकल्प किमंतीचा विचार करता बाह्यसाय्यीत कर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी प्राथमिक प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या आर्थिक व्यवहार विभागाच्या संकेत स्थळावर महाराष्ट्र शासनाच्या शिफारशीसह मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदर अहवालास केंद्र शासनाची मंजूरी मिळताच काम हाती घेण्याची कार्यवाही करण्यात येईल. प्राधिकरणाच्या १५४ व्या बैठकीमध्ये सदरहू सेतू विरार ते पालघर पर्यंत वाढविण्यासाठी व्यवहार्यता तपासणे व त्यानुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता सल्लागारास नियुक्ती करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

## मुंबईतील आरे मधील वृक्ष तोडीबाबत

**(४५) ६६३०८ (२७-०८-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुलबा-वांद्रे सीप्झ मेट्रो-३ मार्गिकेच्या कामासाठी आरे कॉलनीतील ८४ झाडे तोडण्याची मा.सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमी झाडे तोडण्याची परवानगी असताना मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने कडक पोलिस बंदोबस्तात माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान १७७ पेक्षा जास्त झाडे तोडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदरील कंपनीवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०९-२०२३) :** (१) व (२) मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दि. २९ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या आदेशान्वये ८४ बाधित झाडांबाबतचा प्रस्ताव वृक्ष प्राधिकरणाकडे पाठपुरावा करण्यास मुंबई मेट्रो कॉर्पोरेशन ली. ला मंजुरी दिली होती. सन २०१९ मध्ये सादर केलेल्या मूळ प्रस्तावापासून ते मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशापर्यंत सुमारे ३ वर्षे आणि १० महिन्यांचा कालावधी तसेच ४ पावसाळे असा कालावधी उलटून गेला असल्याने बाधित १७७ झाडांबाबतचा सुधारित प्रस्ताव वृक्ष प्राधिकरणाकडे सादर करण्यात आला.वृक्ष प्राधिकरणाने विहित प्रक्रिया पूर्ण करून दि. १५ मार्च २०२३ रोजीच्या पत्रान्वये १२४ झाडे कापण्यास व ५३ झाडे पुनर्रोपण करण्यास परवानगी दिली होती. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १७ एप्रिल २०२३ रोजीच्या आदेशान्वये वृक्ष प्राधिकरणाच्या दि. १५ मार्च २०२३ रोजीच्या परवानगी प्रमाणे कार्यवाही करण्यास मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन ली यांना परवानगी दिली आहे. वृक्ष प्राधिकरणाच्या दि. १५ मार्च २०२३ रोजीच्या परवानगीत नमूद असल्याप्रमाणेच मुंबई मेट्रो रेल कोर्पोरेशन लि. यांच्याकडून कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महामेट्रोच्या नळस्टॉप ते वनाज स्थानकाचे स्ट्रक्चरल ऑडिटबाबत

**(४६) ६७६९४ (३१-०८-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील महामेट्रोच्या वनाज ते नळस्टॉप पर्यंत मेट्रोस्थानकाच्या स्ट्रक्चरचा दर्जा आणि सदोष डिजाइन असल्याबाबत निष्कर्ष रेल्वे कंपन्यांमध्ये अधिकारी पदावर कार्यरत असलेल्या पुण्यातील चार तज्ञांनी लेखी स्वरूपात माहिती पुणे महामेट्रोला दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर निष्कर्षावरून महामेट्रो ने वनाज ते नळस्टॉप स्थानकाचे स्ट्रक्चरल ऑडिटचे काम शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कॉलेज ऑफ इंजीनियरिंग पुणे (सीओईपी) ला दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सीओईपी मधील निलंबित सहाय्यक प्राध्यापकाने महामेट्रोला वनाजचे नळस्टॉप स्थानकाचे स्ट्रक्चर सुरू असल्याचे सीओईपीच्या लेटर हेडवर स्वाक्षरी आणि शिक्कासह बोगस अहवाल सादर केल्याची बाब एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर महामेट्रोला सादर करण्यात आलेल्या बोगस स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्टची उच्चस्तरीय चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) तसेच महामेट्रोच्या नळस्टॉप ते वनाज स्थानकाच्या स्ट्रक्चर सुरक्षित असल्याबाबत अधिकृतपणे अहवाल सादर करण्यात आला आहे काय,

(६) असल्यास, सदर अहवालातील त्रुटी दूर करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

महा मेट्रो पुणे यांनी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने वनाज ते नळ स्टॉप स्थानकाचे स्ट्रक्चरल ऑडिटचे काम सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाला (पुर्वीचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे) यांन दिले होते.

(३) व (४) महा मेट्रो, पुणे यांचेकडे वनाज ते नळ स्टॉप दरम्यान असलेल्या मेट्रो स्थानकाच्या बांधकामामध्ये त्रुटी असल्याबाबतची तक्रार दिनांक ०३.०२.२०२३ रोजी प्राप्त झालेली होती. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने या सर्व स्थानकांचे स्ट्रक्चरल ऑडिट सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ यांच्याकडून करण्याबाबत महा मेट्रोन दिनांक ०८.०२.२०२३ निर्णय घेतला. त्यानुसार विद्यापीठाने डॉ. ईश्वर पुंडलिक सोनार, सयोगी प्राध्यापक, स्थापत्य अभियांत्रिकी यांचेकडे स्ट्रक्चरल ऑडिटचे काम सोपविले. त्यांनी आपला प्रथम अहवाल दिनांक १०.०३.२०२३ रोजी महा मेट्रो ला सादर केला.

श्री डॉ सोनार हे मुळचे शासन नियुक्त अधिव्यखता असुन त्यांची २००९ मध्ये सीओईपी येथे संस्थेच्या नियामक मंडळाद्वारे विहित मार्गाने सहयोगी प्राध्यापक या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या नियुक्तीबाबत काही अक्षेप असल्याने त्यांची नियमक मंडळाद्वारे केलेली सहयोगिक प्राध्यापक पदावरील नियुक्ती अपात्र ठरविण्यात आलेली आहे. मा. उच्च न्यायालयाने दिनांक २५.०५.२०१९ च्या निर्णयानुसार सहयोगी प्राध्यापक या पदावर अपात्र ठरविले होते. परंतू सेवा समाप्ती बाबत श्री सोनार यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले असता मा. सर्वोच्च न्यायालयाने "जैसे थे" (Status Quo) परस्थिती राखण्याचे आदेश दिलेले आहे.

(४) डॉ सोनार यांच्यामार्फत दिनांक १०.०३.२०२३ रोजी महा मेट्रोला सादर केलेल्या अहवालसंबंधि काही स्थानिक वृत्तपत्रामध्ये आक्षेप नोदविल्यामुळे सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाने प्रॉ. बी. जी. बिराजदार यांची मेट्रोच्या स्ट्रक्चरल ऑडिटचे पुर्ननिरीक्षण करण्याकरिता दिनांक १५.०४.२०२३ रोजी नियुक्ती केली. महा मेट्रोला सादर केलेला प्राथमिक अहवालासंदर्भात मा. उच्च न्यायालयात याचिका जनहित याचिका क्र ७४/२०२३ दाखल करण्यात आली होती. मा. उच्च न्यायालयाने आपल्या दिनांक १७.०४.२०२३ च्या आदेशाद्वारे विद्यापीठामार्फत स्ट्रक्चरल ऑडिटचे पुर्ननिरीक्षण करणे व त्यासाठी स्वतंत्र प्राध्यपकाची नियुक्ती करण्यात येत असल्याची बाब मान्य करुन सादर होणारा अंतिम अहवालाची याचिका कर्त्यास सादर करुन दाखल याचिका निकाली काढली आहे. त्यानुसार विद्यापीठाने दिनांक २५.०५.२०२३ रोजी वनाज ते नळस्टॉप दरम्यानच्या स्थानकाचे स्ट्रक्चर ऑडिट करुन आपला अंतिम अहवाल महा मेट्रोला सादर केलेला आहे.

(५) व (६) होय, हे खरे आहे.

मा. उच्च न्यायालयाने (याचिका क्र. ७४/२०२३) बाबत दिलेल्या आदेशास अनुसरुन सदरचे स्ट्रक्चरल ऑडीटच्या कामाची पाहणी करुन प्रा. बिराजदार यांनी महामेट्रो पुणे वनाज ते नळस्टॉप दरम्यानच्या ५ मेट्रो स्थानकांचे स्ट्रक्चरल सुरक्षेबाबत विस्तृत अहवाल सादर केला आहे. पाचही मेट्रो स्थानकाचे मूळ संरचना सुरक्षित असून कारागिरीशी (workmanship) व संरचनात्मक जोड (Structural Connection) यांच्याशी निगडीत दुरुस्त्या सुचविल्या आहेत. त्याप्रमाणे महा मेट्रोमार्फत सर्व त्रुटीची पुर्तता करण्यात आलेली आहे.

---

## धानोरा कोकाटे (ता.तिवसा, जि.अमरावती) सिंचन तलावाचे अपूर्ण काम पूर्ण करणेबाबत

**(४७) ६७९४५ (३१-०८-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानोरा कोकाटे (ता.तिवसा जि.अमरावती) सिंचन तलावाचे काम सन २०१० मध्ये मंजूर होऊन सन २०१५ पर्यंत त्याची कामे करण्यात आली असून सिंचन तलावाचा कोणताही उपयोग शेतकऱ्यांना होत नाही तसेच तलावातील पाणी शेतीत जाऊन पिकांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धानोरा कोकाटे सिंचन तलावाचा शेती सिंचनाकरीता लाभ होईल तसेच शेती पिकाचे नुकसान होणार नाही याकरीता तलावाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, अमरावती यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सदर योजना ही सिंचन तलाव नसून साठवण तलाव आहे. या योजनेचे काम सन २०१५ मध्ये सुरु करण्यात आले होते. परंतू सुप्रमा अभावी काम पुर्ण होवू शकले नाही. तलावांत अद्याप पाणीसाठा झाला नसल्यामुळे तलावातील पाणी शेतात जाण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) होय. हे खरे आहे.

(३) सदर कामास शासन निर्णय दिनांक ३१ मार्च,२०२३ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) राजेवाडी धरणाची दुरुस्ती करण्याबाबत

**(४८) ६८९३९ (३१-०८-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील राजेवाडी लघु पाटबंधारे योजनेचे काम सन २००० मध्ये पूर्ण झाले असून, या योजनेमुळे चिपळूण तालुक्यातील डेरवण, सावर्डे आणि आसपासच्या १०-१२ गावांच्या पाण्याचा प्रश्न सुटला होता. मात्र सध्या धरणातून पाण्याची गळती सुरु झाल्याने या धरणावर अवलंबून असणाऱ्या गावांना पाण्याची समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, या राजेवाडी धरणातून पाण्याची गळती सुरु झाल्याने धरणाची तात्काळ दुरुस्ती न झाल्यास तिवरे धरणासारखी पुनरावृत्ती होऊन आजूबाजूच्या गावांना धोका निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, राजेवाडी लघु पाटबंधारे योजनेच्या दुरुस्ती अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून, सहाय्यक मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र पुणे-६ यांचे पत्र क्रमांक जा.क्र.प्रशा-३/४२३४, दि. ६ डिसेंबर, २०२२ अन्वये ठाणे मंडळ कार्यालयाने शेरे पूर्तता अहवाल शासनास सादर केलेला असून अद्याप प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, राजेवाडी धरणाची उंची ३१ मीटर असून लांबी ४६० मीटर आहे. आणि दुरुस्ती किंमत रुपये ९४३ लक्ष इतकी आहे. परंतु नवीन CSR नुसार अंदाजपत्रकाच्या किंमतीमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. नवीन CSR नुसार अंदाजपत्रकाच्या दरानुसार शासन मान्यता देईल काय,

(५) असल्यास, चिपळूण तालुक्यातील तिवरे धरणासारखी पुनरावृत्ती होऊ नये म्हणून राजेवाडी धरणाची तातडीने दुरुस्ती होणेकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. धरणाच्या मुख्य विमोचकामधून गळती आहे. तिवरे धरणासारखी पुनरावृत्ती होऊ नये याकरिता पावसाळी हंगाममध्ये योजनेच्या पाणीसाठा करण्यात येत नाही.

(३) होय, हे खरे आहे. सन २०२१२-२२ च्या दरसुचीनुसार राजेवाडी ल.पा.योजनेचे दुरुस्ती अंदाजत्रक रु.९४३ लक्ष सादर करण्यात आले होते. सदर अंदाजपत्रक शेरेपुर्तता करून पुन्हा दि.०६/१२/२०२२ रोजी सादर करण्यात आले होते. परंतू माहे मार्च २०२३ विभागाची सन २०२२-२३ ची दरसुची लागू झाल्याने सदर योजनेचे रु.१४८० लक्ष किंमतीचे दुरुस्तीचे अंदाजपत्रक पुनश्च सादर करण्याची कार्यवाही विभागीय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) सदर योजना शासनाच्या प्रचलित मापदंडात सफल होत आहे.

(५) योजनेच्या दुरुस्तीचे रु.१४८० लक्ष रक्कमेच्या अंदाजपत्रकास शासन मान्यता प्राप्त होताच योजनेच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नगर तालुक्यातील (जि.अहमदनगर) को. प. बंधाऱ्यांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यास होत असलेला विलंब

**(४९) ६९१३५ (३१-०८-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर तालुक्यातील (जि.अहमदनगर) को.प. बंधारा कापूरवाडी (कराळे मळा नं १), को.प.बंधारा कापुरवाडी (मुंजाबा), को.प.बंधारा (गांवठाण) व को.प.बंधारा पोखर्डी (वन जमीनीजवळ) या चार बंधाऱ्यांच्या कामांच्या निविदा मागविण्यात येऊन निविदांची तांत्रिक पडताळणी करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर निविदांची तांत्रिक पडताळणी करण्यात येऊन व प्रदीर्घ कालावधी होऊनही त्यांची आर्थिक पडताळणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०९-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) सदर कामाचे ई निविदा कार्यवाहीत संगणकीय आर्थिक लिफाफा उघडण्याची प्रक्रिया दिनांक ०७/०७/२०२३ रोजी पुर्ण करण्यात आलेली असून निविदा स्विकृती कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातील सर्व घलु पाटबंधारे तलाव, साठवण तलाव, पाझर तलाव, गाव तलाव व इतर बांधकामे यांच्या दुरुस्तीबाबत

**(५०) ६९५६२ (३१-०८-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवरे (ता.चिपळूण,जि.रत्नागिरी) धरणफुटीच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता जिल्ह्यातील सर्व लघु पाटबंधारे तलाव, साठवण तलाव, पाझर तलाव, गाव तलाव व इतर बांधकामे यांच्या सद्य:स्थितीबाबत तात्काळ पाहणी करुन त्यांच्या सुस्थितीबाबत व आवश्यक दुरुस्तीबाबत स्वतंत्र आढावा घेऊन अहवाल तयार करावा तसेच आवश्यक उपाययोजना तात्काळ कराव्यात असे लेखी आदेश मृद व जलसंधारण विभागाच्या अप्पर आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने स्वतंत्र आढावा घेऊन याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) अद्याप आढावा अहवाल शासनास सादर करण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०९-२०२३) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.

अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे योनी दिनांक १०/०५/२०२३ च्या पत्रान्वये पावसाळया दरम्यान धरण फुटी अथवा क्षतिग्रस्त होण्याची घटना उद्भवू नये यासाठी जिल्ह्यातील सर्व लघुपाटबंधारे तलाव, साठवण तलाव, पाझर तलाव, गाव तलाव व इतर बांधकामे यांच्या सद्यस्थितीबाबत तात्काळ पाहणी करून त्यांच्या सुस्थितीबाबत व अत्यावश्यक दुरुस्तीबाबत स्वतंत्र आढावा घेऊन अहवाल तयार करावा तसेच अत्यावश्यक उपाययोजना तात्काळ कराव्यात असे लेखी आदेश विभागीय स्तरावर निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(२) जिल्ह्यातील सर्व लघुपाटबंधारे तलावांच्या सद्यस्थितीबाबत पाहणी करून त्यांच्या सुस्थितीबाबत व आवश्यक दुरुस्तीबाबत स्वतंत्र आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच विभागीय कार्यालयाचे दिनांक ०२/०६/२०२३ च्या पत्रान्वये विभातंर्गत असणाऱ्या १६ लघुपाटबंधारे योजनांचा पावसाळ्यापुर्वी सन २०२३ चा धरण तपासणी अहवाल मुख्य अभियंता, धरण सुरक्षा संघटना, नाशिक यांच्या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**नागपूर.** **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.